भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८

(१९५८ चा अधिनियम क्रमांक २०)

[१ जुलै, १९८० रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Probation of Offenders Act, 1958

(Act No. 20 of 1958)

[*As in force on the 1st July, 1980*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९८१

[किंमत—६० पैसे]

# अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८

## विशोधन अधिनियमांची सूची

'भारताचा १९७८ चा अधिनियम ४६'

# अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८

## कलमांचा क्रम


कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. विवक्षित अपराध्यांना यथोचित समज देऊन सोडून देण्याची न्यायालयाची शक्ती.

४. विवक्षित अपराध्यांना सद्वर्तनाच्या शर्तीवर परिवीक्षाधीन ठेवून सोडून देण्याची न्यायालयाची शक्ती.

५. सोडून दिलेल्या अपराध्यांना, भरपाई व खर्च देण्यास फर्मावण्याची न्यायालयाची शक्ती.

६. एकवीस वर्षे वयाखालील अपराध्यांना कारावासाची शिक्षा देण्यावरील निर्बंध.

७. परिवीक्षा अधिकाऱ्यांचा अहवाल गोपनीय असणे.

८. परिवीक्षेच्या शर्तीमध्ये बदल करणे.

९. अपराध्याने बंधपत्राच्या शर्तीचे पालन करण्यात कसूर केली तर त्याबाबतीतील कार्यपद्धती.

१०. जामीनदारांसंबंधीचा उपबंध.

११. या अधिनियमाखाली आदेश देण्यास सक्षम असलेली न्यायालये, अपिले व पुनरीक्षण आणि न्यायालयांना अपिले व पुनरीक्षण यांसंबंधी असलेल्या शक्ती.

१२. दोषसिद्धीच्या अनुषंगाने येणारी निरर्हता दूर करणे.

१३. परिवीक्षा अधिकारी.

१४. परिवीक्षा अधिकाऱ्याची कर्तव्ये.

१५. परिवीक्षा अधिकारी हे लोकसेवक असणे.

१६. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

१७. नियम करण्याची शक्ती.

१८. विवक्षित अधिनियमितींच्या प्रवर्तनाची व्यावृत्ती.

१९. संहितेचे कलम ५६२ हे विवक्षित क्षेत्रांना लागू नसणे.

महाराष्ट्र विशोधन अधिनियम.



एच ४३१९—२(५३२—१-८१)

# अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८

## (१९५८ चा अधिनियम क्रमांक २०)[१]

[१६ मे, १९५८]

अपराध्यांना परिवीक्षाधीन ठेवून किंवा यथोचित समज देऊन सोडून देण्याबाबत आणि त्यांच्याशी निगडित असलेल्या बाबींविषयी उपबंध करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :--

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास 'अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

(३) राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो त्या त्या राज्यामध्ये अंमलात येईल, आणि राज्याच्या निरनिराळ्या क्षेत्रांसाठी निरनिराळे दिनांक नियत करता येतील.

**व्याख्या.**

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,--

(क) "संहिता" याचा अर्थ, 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५), असा आहे ;

(ख) "परिवीक्षा अधिकारी" याचा अर्थ, कलम १३ अन्वये परिवीक्षा अधिकारी म्हणून नियुक्त केलेला किंवा तसा ओळखला जाणारा एखादा अधिकारी, असा आहे ;

(ग) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(घ) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) यामध्ये नेमून देण्यात आल्याप्रमाणे ते ते अर्थ असतील.

**विवक्षित अपराध्यांना यथोचित समज देऊन सोडून देण्याची न्यायालयाची शक्ती.**

३. जर कोणतीही व्यक्ती, 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)-कलम ३७९ किंवा कलम ३८० किंवा कलम ३८१ किंवा कलम ४०४ किंवा कलम ४२० खाली शिक्षापात्र असलेला अपराध केल्याबद्दल अथवा 'भारतीय दंड संहिता' किंवा इतर कोणताही कायदा याखाली दोन वर्षांहून अधिक नाही इतक्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असा कोणताही अपराध केल्याबद्दल दोषी ठरली असेल, आणि त्यापूर्वी केव्हाही ती दोषी ठरल्याचे सिद्ध झाले नसेल आणि ज्या न्यायालयाने त्या व्यक्तीला दोषी ठरवले त्या न्यायालयाचे जर असे मत असेल की अपराधाचे स्वरूप व अपराध्याचे चारित्र्य यांसह त्या प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेता, तसे करणे इष्ट आहे, तर त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, त्या व्यक्तीस कोणतीही शिक्षा ठोठावण्याऐवजी किंवा कलम ४ खाली सद्वर्तनाच्या शर्तीवर परिवीक्षाधीन ठेवण्याऐवजी ते न्यायालय त्या व्यक्तीला यथोचित समज देऊन तिला सोडून देऊ शकेल.

**स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनासाठी एखाद्या व्यक्तीविरुद्ध झालेली पूर्वीची दोषसिद्धी यामध्ये या कलमान्वये किंवा कलम ४ अन्वये तिच्याविरुद्ध पूर्वी काढलेल्या कोणत्याही आदेशाचा समावेश होतो.

**विवक्षित अपराध्यांना सद्वर्तनाच्या शर्तीवर परिवीक्षाधीन ठेऊन सोडून देण्याची न्यायालयाची शक्ती.**

४. (१) जर कोणतीही व्यक्ती, मृत्यूच्या किंवा जन्मठेपेच्या शिक्षेस पात्र नसलेला अपराध केल्याबद्दल दोषी ठरली असेल आणि ज्या न्यायालयाने त्या व्यक्तीला दोषी ठरवले त्या न्यायालयाचे जर असे मत असेल की, अपराधाचे स्वरूप व अपराध्याचे चारित्र्य यांसह त्या प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेता, अपराध्याला सद्वर्तनाच्या शर्तीवर परिवीक्षाधीन ठेवून सोडून देणे इष्ट आहे, तेव्हा त्या त्याकाळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, त्या व्यक्तीस एकदम कोणतीही शिक्षा ठोठावण्याऐवजी, ते न्यायालय स्वतः निदेशित करील त्याप्रमाणे जास्तीत जास्त तीन वर्षांच्या कालावधीत फर्मावण्यात येईल तेव्हा उपस्थित होऊन शिक्षादेश स्वीकारण्याबाबत, आणि मध्यंतरीच्या काळात शांतता राखून स्वतःचे वर्तन चांगले ठेवण्याबाबत अपराध्याने जामीनदारांसहित किंवा त्यांच्याविना बंधपत्र करून दिल्यावर त्याला सोडून देण्यात यावे असा ते निदेश देऊ शकेल :

परंतु, जेथे न्यायालयाची अधिकारिता आहे किंवा अपराध्याने ज्या कालावधीसाठी बंधपत्र करून दिले असेल त्या कालावधीत तो जेथे राहण्याचा संभव असेल त्या स्थळी अपराध्याचे किंवा त्याला कोणतीही व्यक्ती जामीन राहिली असल्यास, त्या व्यक्तीचे स्थिर वास्तव्याचे ठिकाण किंवा नेहमीच्या व्यवसायाचे ठिकाण आहे याबद्दल न्यायालयाची खात्री झाल्याशिवाय, न्यायालय अशा अपराध्यास याप्रमाणे सोडून देण्यासंबंधी निदेश देणार नाही.

---

१. हा अधिनियम, १९६८ चा अधिनियम २६--कलम ३ व अनुसूची यांद्वारे संघराज्याच्या पाँडेचरी क्षेत्रास लागू करण्यात आला.

(२) पोटकलम (१) खाली कोणताही आदेश काढण्यापूर्वी, न्यायालय त्या प्रकरणाच्या संबंधात संबंधित परिवीक्षा अधिकाऱ्याने कोणताही अहवाल दिलेला असल्यास, तो अहवाल विचारात घेईल.

(३) पोटकलम (१) अन्वये आदेश काढण्यात येईल तेव्हा, अपराधी व जनता यांच्या हिताच्या दृष्टीने तसे करणे इष्ट आहे असे न्यायालयाचे मत असेल तर, ते न्यायालय, पोटकलम (१) खालील आदेशाशिवाय आणखी एक पर्यवेक्षण आदेश काढून असा निदेश देऊ शकेल की, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे एका वर्षाहून कमी नाही इतक्या कालावधीपर्यंत अपराधी हा त्यात नामनिर्दिष्ट केलेल्या परिवीक्षा अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली राहील आणि ते न्यायालय, अशा पर्यवेक्षण आदेशात, अपराध्यावर यथोचित देखरेख ठेवण्यासाठी आपणास आवश्यक वाटतील अशा शर्ती घालू शकेल.

(४) पोटकलम (३) खालील पर्यवेक्षण आदेश काढणारे न्यायालय, अपराध्याला सोडून देण्यापूर्वी, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींचे व निवास, मादक द्रव्यांचे वर्जन किंवा अन्य कोणतीही गोष्ट याबाबतीत विशिष्ट परिस्थिती लक्षात घेतल्यानंतर, अपराध्याकडून तोच अपराध पुन्हा घडू नये किंवा दुसरे कोणतेही अपराध घडू नयेत या दृष्टीने ज्या जादा शर्ती घालणे न्यायालयास योग्य वाटेल अशा शर्तींचे पालन करण्यासंबंधी अपराध्यास जामीनदारांसहित किंवा त्यांच्याविना बंधपत्र करून देण्यास फर्मावील.

(५) पोटकलम (३) खालील पर्यवेक्षण आदेश काढणारे न्यायालय, आदेशाच्या अटी व शर्ती अपराध्यास समजावून सांगेल आणि पर्यवेक्षण आदेशाची एकेक प्रत प्रत्येक अपराध्यास आणि कोणतेही जामीनदार असल्यास, अशा जामीनदारांना आणि संबंधित परिवीक्षा अधिकाऱ्यास तावडतोब पुरवील.

**सोडून दिलेल्या अपराध्यांना भरपाई व खर्च देण्यास फर्मावण्याची न्यायालयाची शक्ती.**

५. (१) कलम ३ किंवा कलम ४ खाली अपराध्याला सोडून देण्याचा निदेश देणारे न्यायालय, स्वतःला योग्य वाटल्यास, त्याच वेळी—

(क) अपराध घडल्यामुळे कोणत्याही व्यक्तीला पोचलेली हानी किंवा इजा याबद्दल न्यायालयास वाजवी वाटेल इतकी भरपाई आणि

(ख) न्यायालयास वाजवी वाटेल असा कार्यवाहीचा खर्च

देण्यासंबंधी त्याला निदेशित करणारा आणखी एक आदेश काढू शकेल.

(२) पोटकलम (१) खाली भरपाई म्हणून किंवा कार्यवाहीचा खर्च म्हणून जी रक्कम देण्यासंबंधी आदेश काढण्यात आला असेल ती रक्कम संहितेची कलमे ३८६ व ३८७ यांच्या उपबंधांस अनुसरून द्रव्यदंड म्हणून वसूल करता येईल.

(३) ज्या बाबीसाठी अपराध्यावर खटला भरण्यात आला असेल त्याच बाबीतून उद्भवलेल्या कोणत्याही दाव्याची संपरीक्षा करणारे दिवाणी न्यायालय, नुकसानी देववताना, पोटकलम (१) अन्वये भरपाई म्हणून दिली गेलेली किंवा वसूल केली गेलेली कोणतीही रक्कम विचारात घेईल.

**एकवीस वर्षे वयाखालील अपराध्यांना कारावासाची शिक्षा देण्यावरील निर्बंध.**

६. (१) एकवीस वर्षे वयाखालील कोणतीही व्यक्ती, कारावासाच्या शिक्षेस (परंतु जन्मठेपेच्या नव्हे) पात्र असा एखादा अपराध केल्याबद्दल दोषी ठरली असेल तेव्हा, ज्या न्यायालयाने त्या व्यक्तीस दोषी ठरवले असेल ते न्यायालय अपराधाचे स्वरूप व अपराध्याचे चारित्र्य यांसह त्या प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेता कलम ३ किंवा कलम ४ अन्वये अपराध्याबाबत कार्यवाही करणे इष्ट होणार नाही याबद्दल स्वतःची खात्री पटल्याशिवाय त्या व्यक्तीला कारावासाची शिक्षा ठोठावणार नाही आणि न्यायालयाने अपराध्याला कोणतीही कारावासाची शिक्षा ठोठावल्यास, ते न्यायालय तसे करण्याबद्दलची आपली कारणे नमूद करील.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अपराध्याच्या बाबतीत कलम ३ किंवा कलम ४ खाली कार्यवाही करणे इष्ट होणार नाही किंवा कसे याबद्दल आपली खात्री करून घेण्यासाठी न्यायालय परिवीक्षा अधिकाऱ्याकडून अहवाल मागवील आणि कोणताही अहवाल मिळाला असल्यास, तो असा अहवाल व अपराध्याचे चारित्र्य आणि शारीरिक व मानसिक स्थिती यासंबंधी न्यायालयास उपलब्ध असलेली इतर कोणतीही माहिती ते न्यायालय विचारात घेईल.

**परिवीक्षा अधिकाऱ्याचा अहवाल गोपनीय असणे.**

७. कलम ४ च्या पोटकलम (२) मध्ये किंवा कलम ६ च्या पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेला परिवीक्षा अधिकाऱ्याचा अहवाल गोपनीय समजण्यात येईल :

परंतु, अहवालाचा सारांश अपराध्याला कळविणे योग्य आहे असे स्वतःला वाटल्यास, न्यायालय तसे करू शकेल आणि अहवालात नमूद करण्यात आलेल्या बाबींशी संबद्ध असेल असा पुरावा हजर करण्याची संधी त्याला देऊ शकेल.

**परिवीक्षेच्या शर्तींमध्ये बदल करणे.**

८. (१) परिवीक्षा अधिकाऱ्याने अर्ज केला असता जर अपराध्याच्या संबंधात कलम ४ खाली आदेश काढणाऱ्या कोणत्याही न्यायालयाचे असे मत झाले की, अपराध्याने करून दिलेल्या कोणत्याही बंधपत्राच्या शर्तींमध्ये बदल करणे अपराध्याच्या व जनतेच्या हिताच्या दृष्टीने समयोचित किंवा आवश्यक आहे, तर बंधपत्र प्रभावी असेल अशा कालावधीत केव्हाही ते न्यायालय बंधपत्राची मुदत वाढवून—मात्र अशा प्रकारे की जेणेकरून मूळ आदेशाच्या तारखेपासून तीन वर्षांपेक्षा अधिक होणार—नाही किंवा ती कमी करून अथवा बंधपत्राच्या शर्तींमध्ये फेरफार करून किंवा त्यात नवीन शर्ती समाविष्ट करून, त्या बंधपत्रात बदल करू शकेल :

परंतु, अपराध्याला आणि जामीनदाराला किंवा जामीनदारांना आपली बाजू मांडण्याची संधी दिल्या-खेरीज, असा कोणताही बदल करण्यात येणार नाही.

(२) पोटकलम (१) खाली करावयाचे योजलेल्या कोणत्याही बदलाला संमती देण्याचे कोणत्याही जामीनदाराने नाकारले तर, न्यायालय अपराध्याला नवीन बंधपत्र करून देण्यास फर्मावू शकेल आणि अपराध्याने तसे बंधपत्र करून देण्याचे नाकारले किंवा त्याकामी कसूर केली तर, अपराधी ज्या अपराधा-बद्दल दोषी ठरला होता त्या अपराधाबद्दल शिक्षा ठोठावू शकेल.

(३) यात यापूर्वी काहीही अंतर्भूत असले तरी, परिवीक्षा अधिकाऱ्याने अर्ज केला असता अपराध्याच्या संबंधात कलम ४ खाली आदेश काढणाऱ्या न्यायालयाची अशी खात्री पटली की, अपराध्याला आणखी काही काळ देखरेखीखाली ठेवणे अनावश्यक ठरेल असे त्याचे वर्तन आहे, तर न्यायालय अपराध्याने करून दिलेले बंधपत्र किंवा बंधपत्रे विसर्जित करू शकेल.

अपराध्याने बंधपत्राच्या शर्तीचे पालन करण्यात कसूर केली तर त्याबाबतीतील कार्यपद्धती.

९. (१) जे न्यायालय एखाद्या अपराध्याच्या संबंधात कलम ४ खाली आदेश काढील त्या न्यायालयास किंवा जे न्यायालय अपराध्याच्या मूळच्या अपराधाच्या संबंधात त्याच्याबाबत कार्यवाही करू शकले असते अशा कोणत्याही न्यायालयास, परिवीक्षा अधिकाऱ्याने अहवाल सादर केल्यावरून किंवा अन्यथा अपराध्याने करून दिलेल्या बंधपत्राच्या किंवा बंधपत्रांच्या कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात अपराध्याने कसूर केली आहे असे सकारण वाटत असेल तर, ते न्यायालय अपराध्याच्या अटकेसाठी वॉरंट काढू शकेल किंवा स्वतःला योग्य वाटल्यास, अपराध्यावर किंवा त्याचे कोणी जामीनदार असल्यास, त्यांच्यावर समन्स बजावून, समन्समध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वेळी न्यायालयापुढे हजर होण्याबद्दल अपराध्याला किंवा त्याच्या जामीनदारांना फर्मावू शकेल.

(२) ज्या न्यायालयापुढे अपराध्याला अशा रीतीने आणले जाईल किंवा तो हजर होईल ते न्यायालय, एक तर अपराध्याला प्रकरणाचा निर्णय लागेतोपर्यंत हवालतीत पाठवू शकेल किंवा सुनावणी-साठी न्यायालय ठरवील अशा तारखेस हजर राहण्यासाठी अपराध्याला जामीनदारासहित किंवा त्याच्या-विना जामीनादेश देऊ शकेल.

(३) प्रकरणाची सुनावणी झाल्यानंतर जर, अपराध्याने करून दिलेल्या बंधपत्राच्या किंवा बंध-पत्रांच्या शर्तीचे पालन करण्यात अपराध्याने कसूर केली आहे याबद्दल न्यायालयाची खात्री पटली तर न्यायालय ताबडतोब——

(क) मूळच्या अपराधाबद्दल अपराध्याला शिक्षा ठोठावू शकेल किंवा

(ख) ती कसूर प्रथमच घडली असेल त्या बाबतीत, बंधपत्र अंमलात असण्याचे चालू राहण्यास बाध न येता, अपराध्यावर जास्तीत जास्त पन्नास रुपयांपर्यंत दंड बसवू शकेल.

(४) पोटकलम (३)-खंड (ख) खाली बसवण्यात आलेला दंड न्यायालय ठरवील तितक्या मुदतीत देण्यात आला नाही तर, न्यायालय अपराध्याला मूळ अपराधाबद्दल शिक्षा ठोठावू शकेल.

जामीनदारांसंबंधीचा उपबंध.

१०. संहितेची कलमे १२२, १२६, १२६क, ४०६क, ५१४, ५१४क, ५१४ख, आणि ५१५ यांचे उपबंध, या अधिनियमाखाली दिलेली बंधपत्रे व जामीनदार यांच्याबाबतीत, होईल तेथवर लागू होतील.

या अधिनियमाखाली आदेश देण्यास सक्षम असलेली न्यायालये, अपिले व पुनरीक्षण आणि न्यायालयांना अपिले व पुनरीक्षण यासंबंधी असलेल्या शक्ती.

११. (१) संहिता किंवा इतर कोणताही कायदा यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील आदेश, हा संपरीक्षा करण्याची आणि अपराध्याला कारावासाची शिक्षा देण्याची शक्ती प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही न्यायालयास, तसेच उच्च न्यायालयापुढे किंवा अन्य कोणत्याही न्यायालयापुढे अपील म्हणून किंवा पुनरीक्षणासाठी ते प्रकरण येईल त्याबाबतीत, त्या न्यायालयालादेखील काढता येईल.

(२) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३ किंवा कलम ४ खालील आदेश अपराध्याची संपरीक्षा करणारे उच्च न्यायालय सोडून अन्य कोणत्याही न्यायालयाने काढला असेल त्याबाबतीत, पूर्वोक्त न्यायालयाच्या शिक्षादेशाविरुद्ध करावयाची अपिले सामान्यतः ज्या न्यायालयाकडे होऊ शकतात त्या न्यायालयाकडे अपील होऊ शकेल.

(३) एकवीस वर्षे वयाखालील कोणतीही व्यक्ती एखादा अपराध केल्याबद्दल दोषी ठरली असून आणि ज्या न्यायालयाने त्या व्यक्तीस दोषी ठरवले असेल त्या न्यायालयाने कलम ३ किंवा कलम ४ खाली तिच्याविरुद्ध कार्यवाही करण्याचे नाकारले असून तिच्याविरुद्ध द्रव्यदंडासहित किंवा त्याविना कारावासाचा शिक्षादेश काढला असेल आणि त्या शिक्षादेशाविरुद्ध अपील होऊ शकत नसेल किंवा ते दाखल करण्यात आले नसेल तर संहितेमध्ये किंवा इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पूर्वोक्त न्याया-लयाने काढलेल्या शिक्षादेशाविरुद्ध ज्या न्यायालयाकडे सामान्यतः अपिले होऊ शकतात ते न्यायालय, स्वतः होऊन अथवा दोषी ठरलेल्या व्यक्तीने किंवा परिवीक्षा अधिकाऱ्याने अर्ज केल्यावरून, त्या प्रकरणाचे कागदपत्र मागवून ते तपासू शकेल आणि त्यावर स्वतःस योग्य वाटेल असा आदेश काढू शकेल.

(४) अपराध्याच्या संबंधात कलम ३ किंवा कलम ४ खाली आदेश काढण्यात आला असेल तर अपील न्यायालय किंवा उच्च न्यायालय आपल्या पुनरीक्षणाच्या शक्तीचा वापर करून, असा आदेश रद्द ठरवू शकेल आणि त्याऐवजी अशा अपराध्याविरुद्ध कायद्यानुसार शिक्षादेश काढू शकेल :

परंतु, अपील न्यायालय किंवा पुनरीक्षण करणारे उच्च न्यायालय, ज्या न्यायालयाने अपराध्याला दोषी ठरवले असेल त्या न्यायालयाने त्याला जी शिक्षा ठोठावली असती त्या शिक्षेहून अधिक शिक्षा अपराध्याला ठोठावणार नाही.

दोषसिद्धीच्या अनुषंगाने येणारी निरर्हता दूर करणे.

१२. इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या अपराधाबद्दल जी व्यक्ती दोषी ठरलेली असून कलम ३ किंवा कलम ४ अन्वये तिच्याविरुद्ध कार्यवाही करण्यात आली असेल ती व्यक्ती, अशा कायद्याखाली एखाद्या अपराधाबद्दल होणाऱ्या दोषसिद्धीच्या अनुषंगाने येणारी कोणतीही निरर्हता असल्यास, त्या निरर्हतेस पात्र ठरणार नाही :

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट, कलम ४ खाली सुटका झाल्यानंतर जिला मूळ अपराधाबद्दल मागाहून शिक्षा ठोठावण्यात आली असेल अशा व्यक्तीस लागू होणार नाही.

परिवीक्षा अधिकारी.

१३. (१) या अधिनियमाखालील परिवीक्षा अधिकारी म्हणजे पुढील प्रकारची व्यक्ती असेल :—

(क) राज्य शासनाने परिवीक्षा अधिकारी म्हणून नेमलेली किंवा राज्य शासनाकडून तसा अधिकारी म्हणून मान्यता मिळालेली एखादी व्यक्ती ; किंवा

(ख) राज्य शासनाने याबाबतीत मान्यता दिलेल्या एखाद्या संस्थेने या प्रयोजनासाठी उपलब्ध केलेली एखादी व्यक्ती ; किंवा

(ग) कोणत्याही अपवादात्मक प्रकरणात त्या प्रकरणाच्या विशेष परिस्थितीत परीवीक्षा अधिकारी म्हणून काम करण्यास जी व्यक्ती योग्य आहे असे न्यायालयाचे मत असेल अशी इतर कोणतीही व्यक्ती.

(२) कलम ४ खाली आदेश काढणारे न्यायालय किंवा अपराधी त्या त्या काळी जेथे राहात असेल त्या जिल्ह्याचा जिल्हा दंडाधिकारी कोणत्याही वेळी, पर्यवेक्षण आदेशात नाव नमूद केलेल्या व्यक्तींच्या जागी कोणत्याही परिवीक्षा अधिकाऱ्यास नियुक्त करू शकेल.

**स्पष्टीकरण**.—या कलमाच्या प्रयोजनार्थ, इलाखाशहर हे जिल्हा असल्याचे मानण्यात येईल आणि इलाखाशहर दंडाधिकारी हा, त्या जिल्ह्याचा जिल्हा दंडाधिकारी असल्याचे मानण्यात येईल.

(३) परिवीक्षा अधिकारी या अधिनियमाखालील आपल्या कर्तव्यांचे पालन करीत असताना, अपराधी त्या त्या काळी जेथे राहात असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या नियंत्रणास अधीन असेल.

परिवीक्षा अधिकाऱ्याची कर्तव्ये.

१४. परिवीक्षा अधिकारी, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या व अटींच्या अधीनतेने,—

(क) अपराधाचा आरोप ठेवण्यात आलेल्या व्यक्तीचे प्रकरण हाताळण्याची सुयोग्य पद्धत कोणती ते ठरवण्याच्या कामी न्यायालयाला सहाय्य व्हावे या दृष्टीने, न्यायालयाच्या कोणत्याही निदेशांनुसार त्या व्यक्तीची परिस्थिती किंवा तिच्या घरीदारीचे वातावरण यासंबंधी चौकशी करील;

(ख) परिवीक्षाधीन असलेल्या किंवा आपल्या देखरेखीखाली ठेवण्यात आलेल्या इतर व्यक्तींवर देखरेख ठेवील, आणि आवश्यक असेल त्याबाबतीत, त्यांच्यासाठी योग्य असा कामधंदा शोधण्यासाठी प्रयत्नशील राहील ;

(ग) जितकी भरपाई किंवा खर्च देण्याचा न्यायालयाने आदेश दिला असेल त्या रकमेचा भरणा करण्याबाबत अपराध्यांना सल्ला देईल व मदत करील ;

(घ) कलम ४ खाली ज्यांना सोडून देण्यात आले असेल अशा व्यक्तींना, विहित करण्यात येईल अशा प्रकरणी आणि अशा रीतीने सल्ला देईल व मदत करील ; आणि

(ङ) विहित करण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

परिवीक्षा अधिकारी हे लोकसेवक असणे.

१५. या अधिनियमास अनुसरून नियुक्त करण्यात आलेला प्रत्येक परीवीक्षा अधिकारी आणि इतर प्रत्येक अधिकारी हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ५)-कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

१६. या अधिनियमास किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमांस किंवा आदेशांस अनुसरून जी गोष्ट सद्भावपूर्वक केलेली असेल किंवा करण्याचे योजलेली असेल अशा कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत, राज्य शासन अथवा या अधिनियमान्वये नियुक्त करण्यात आलेला कोणताही परिवीक्षा अधिकारी किंवा इतर कोणताही अधिकारी यांच्या विरुद्ध दावा किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

नियम करण्याची शक्ती.

१७. (१) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी केंद्र शासनाच्या मान्यतेने नियम करू शकेल.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेला बाध न येता अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसंबंधी उपबंध करता येईल :—

(क) परिवीक्षा अधिकाऱ्यांची नियुक्ती, त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि जेथे त्यांनी आपल्या अधिकारितेचा वापर करावयाचा आहे, ते क्षेत्र ;

(ख) परिवीक्षा अधिकाऱ्यांची या अधिनियमाखालील कर्तव्ये आणि त्यांनी अहवाल सादर करणे ;

(ग) कलम १३-पोटकलम (१) च्या खंड (ख) च्या प्रयोजनार्थ संस्थांना कोणत्या शर्तीवर मान्यता देता येईल ;

(घ) परिवीक्षा अधिकाऱ्यांना मेहेनताना आणि खर्च देणे किंवा ज्या संस्थेकडून परिवीक्षा अधिकारी उपलब्ध करुन देण्यात येतात अशा कोणत्याही संस्थेस अर्थसहाय्य देणे, आणि

(ङ) विहित करावयाची किंवा करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या कलमाखाली करण्यात आलेले सर्व नियम पूर्वप्रकाशनाच्या शर्तीस अधीन असतील आणि ते करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येतील.

**विवक्षित अधिनियमितींच्या प्रवर्तनाची व्यावृत्ती.**

**१८.** या अधिनियमातील कोणत्याही गोष्टींमुळे 'सुधारशाळा अधिनियम, १८९७' (१८९७ चा ८) याचे कलम ३१ किंवा 'भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९४७' (१९४७ चा २) याचे कलम ५-पोटकलम (२) [1][किंवा, 'स्त्रिया व मुली यांच्या अनैतिक व्यापारास आळा घालण्याबाबत अधिनियम, १९५६' (१९५६ चा १०४)] किंवा बाल गुन्हेगार किंवा किशोर सुधारालये यांच्यासंबंधी राज्यात अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यांमधील उपबंधांवर परिणाम होणार नाही.

**संहितेचे कलम ५६२ हे विवक्षित क्षेत्रांना लागू नसणे.**

**१९.** कलम १८ च्या उपबंधाच्या अधीनतेने संहितेचे कलम ५६२ हे जेथे हा अधिनियम अंमलात आणण्यात आला आहे त्या राज्यांना किंवा त्यांच्या त्या भागांना लागू होण्याचे बंद होईल.

---

१. भारताचा १९७८ चा अधिनियम ४६-कलम २० द्वारे "किंवा, 'स्त्रिया व मुली यांच्या अनैतिक व्यापारास आळा घालण्याबाबत अधिनियम, १९५६' (१९५६ चा १०४)" हा मजकूर गाळला.

# महाराष्ट्र विशोधन अधिनियम

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१

अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ हा महाराष्ट्र राज्याला लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनासाठी 'अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८' हा महाराष्ट्र राज्याला लागू करताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या विसाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमास 'अपराधी परिवीक्षा (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९६९' असे म्हणता येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्र. १३ याच्या कलम २० ची सुधारणा.

२. 'अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८' हा महाराष्ट्र राज्याला लागू करताना, त्याच्या कलम १३ मधील पोटकलम (१)-खंड (क) मध्ये "राज्य शासनाने परिवीक्षा अधिकारी म्हणून नेमलेल्या" या मजकुराऐवजी "राज्य शासनाने किंवा राज्य शासन लादील अशा निर्बंधाच्या व शर्तींच्या (कोणत्याही असल्यास) अधीनतेने याबाबतीत आदेशाद्वारे, ते प्राधिकृत करील अशा अधिकाऱ्याने परिवीक्षा अधिकारी म्हणून नेमलेला" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## THE PROBATION OF OFFENDERS ACT, 1958

## अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| admonition | समज देणे | [S. 3] |
| appear and receive sentence | उपस्थित होऊन शिक्षादेश स्वीकारणे | [S. 4] |
| discharge the bond | बंधपत्र विसर्जित करणे | [S. 8(3)] |
| fixed place of abode | स्थिर वास्तव्याचे ठिकाण | [S. 4-proviso] |
| grant bail | जामीनादेश देणे | [S. 9(2)] |
| home surroundings | घरीदारींचे वातावरण | [S. 14(a)] |
| imprisonment for life | जन्मठेप | [S. 6(1)] |
| pass sentence | शिक्षादेश काढणे | [S. 11(4)] |
| probation officer | परिवीक्षा अधिकारी | [S. 2(b)] |
| regular occupation | नेहमीचा व्यवसाय | [S. 4] |
| release on probation | परिवीक्षाधीन ठेवून सोडून देणे | [Long title] |
| supervision order | पर्यवेक्षण आदेश | [S. 4(3)] |
| sureties | जामीनदार | [S. 10] |

---

## अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८

## THE PROBATION OF OFFENDERS ACT, 1958

### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| उपस्थित होऊन शिक्षादेश स्वीकारणे | appear and receive sentence | [S. 4] |
| जन्मठेप .. | imprisonment for life | [S. 6(1)] |
| जामीनदार .. | sureties | [S. 10] |
| जामीनादेश देणे .. | grant bail | [S. 9(2)] |
| नेहमीचा व्यवसाय .. | regular occupation | [S. 4] |
| परिवीक्षा अधिकारी .. | probation officer | [S. 2(b)] |
| परिवीक्षाधीन ठेवून सोडून देणे | release on probation | [Long title] |
| पर्यवेक्षण आदेश .. | supervision order | [S. 4(3)] |
| बंधपत्र विसर्जित करणे .. | discharge the bond | [S. 8(3)] |
| शिक्षादेश काढणे .. | pass sentence | [S. 11(4)] |
| घरीदारींचे वातावरण .. | home surrounding | [S. 14(a)] |
| समज देणे .. | admonition | [S. 3] |
| स्थिर वास्तव्याचे ठिकाण .. | fixed place of abode | [S. 4-proviso] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई